K. K. Wagh Institute of Engineering Education & Research, Nashik

# Newspaper coverage of T&P activities for the year 2021-22

लोकमत

## के. के. वाघच्या २६२ विद्यार्थ्यांना मिळाली नोकरीची संधी

### विविध कंपन्यांचा समावेश : वर्षभरात चारपासून आठ लाखांचे वार्षिक पॅकेज



नाशिक : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या २६२ विद्यार्थ्यांना सन २०२१-२२ यावर्षी विविध कंपन्यांमध्ये नोकरीची संधी मिळाली आहे. केवळ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्याच (आयटी) विद्यार्थ्यांना आयटी क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली. त्या व्यतिरिक्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल शाखेच्या विद्यार्थ्यांनादेखील आयटी क्षेत्रात काम करण्याची उत्कृष्ट संधी मिळाली आहे.

इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल शाखेतील अनुक्रमे ११० व १५२ असे एकूण २६२ विद्यार्थ्यांची मुख्य स्पेशलाइजेशन क्षेत्रात (कोर) आणि आयटी क्षेत्रात निवड झाली आहे. शाखा निहाय कंपन्यांमध्ये (कोर) मध्ये एबीबी, अदानी, महिंद्रा अँड महिंद्रा, रिलायन्स, प्राज, केएसबी, रिषभ आणि आयटी कंपन्यांमध्ये इन्फोसीस, टीसीएस, विप्रो, हेक्सावेअर, कॅपजेमिनी, बिर्लासॉफ्ट, अटॉस आदि कंपनींचा समावेश आहे. सुमारे ४० ते ४५ टक्क्यांपर्यंत इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल शाखेच्या विद्यार्थांना आयटी क्षेत्रात डाटा अनॅलिस्ट, प्रोजेक्ट इंजिनिअर, सिस्टम्स इंजिनिअर, असिस्टंट सिस्टम्स इंजिनिअर आणि ग्रेजुएट इंजिनिअर ट्रेनी यांसारख्या पदांसाठी निवड झालेली आहे, अशी माहिती डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे समीर वाघ, चांगदेवराव होळकर, अशोकभाई मर्चंट, प्रा. के. एस. बंदी यांनी सर्व कंपन्यांचे आभार मानले.

Hello Nashik
Page No. 3 Jun 28, 2022
Powered by: erelego.com



# के. के. वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिपची संधी

**नाशिक** : विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय व एबीबी कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने फॅक्टरी डिजिटायझेशनला प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल एक्स्पो कार्यक्रमात इंटर्नशिपची संधी प्राप्त करून दिली. यात महाविद्यालयातील शर्वरी फासे (इलेक्ट्रिक विभाग), सोहेल अन्सारी (मेकॅनिकल विभाग), साईराज दीक्षित (कॉम्प्युटर विभाग) व रितेश बोरसे (आयटी विभाग) या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी तीन महिने इंटर्नशिपच्या काळात उद्योग ४.० च्या दिशेने फॅक्टरी डिजिटायझेशनला प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल एक्स्पोमध्ये लाइव्ह प्रोजेक्टमध्ये काम करून नवीन संकल्पना समजून घेतल्या. यशस्वी इंटर्नशिप पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व ट्रॉफी देण्यात आली. या काळात विद्यार्थ्यांना एबीबीचे सिबीन व मनोज वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या कामकाजाबाबत एबीबीचे प्लांटप्रमुख गणेश कोठावदे यांनी समाधान व्यक्त केले. या प्रक्रियेत एबीबीचे एचआर प्रमुख दयानंद कुलकर्णी यांचे सहकार्य लाभले. या उपक्रमाबद्दल अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने, डॉ. बी. ई. कुशारे, डॉ. पी. डी. भामरे, प्रा. एम. मुरुगकर, डॉ. पी. जे. पवार व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

दै.लोकनामा

नाशिक, गुरुवार, १४ एप्रिल २०२२



# के. के. वाघ अभियांत्रिकीच्या शंभर विद्यार्थ्यांना नोकरीची संधी

लोकनामा प्रतिनिधी

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंटमार्फत नुकत्याच कॅम्पस इंटरव्ह्यू (मुलाखती) झाल्या. यात शंभर विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली.

अखेरच्या वर्षातील विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच नोकरी मिळावी, या उद्देशाने संस्थेतर्फे कॅम्पस ड्राइव्ह घेण्यात आला. यात विप्रो, टीआयएए आणि अल्टिमेट्रिक या कंपन्यांनी सहभाग नोंदवला. या निवडीमुळे विद्यार्थी व पालक यांच्यात आनंदाचे वातावरण आहे. सरासरी ६० टक्के गुण असलेल्या विद्यार्थ्यांना या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये भाग घेण्याची संधी मिळाली होती. या सर्व कंपन्यांची तीन टप्प्यांत मुलाखत प्रक्रिया पार पडली. विप्रो ८९, टीआयएए ०७ व अल्टिमेट्रिक ०४, अशा शंभर जणांना नोकरीची संधी प्राप्त झाली आहे. यात प्रामुख्याने सर्वाधिक ७.५, तर सरासरी चार लाखांचे पॅकेज देऊन ऑफर लेटर देण्यात आले. यात कॉम्प्युटर २९, आयटी १०, इलेक्ट्रिकल १५, इलेक्ट्रॉनिक्स १०, ई अँड टीसी १५, मेकॅनिकल १४, प्रॉडक्शन २, केमिकल २ व सिव्हिल ३, अशा विविध विभागांतील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त चांगदेवराव होळकर, प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, अशोक मर्चंट, सचिव प्रा. के. एस. बंदी, डॉ. एस. एस. साने, डॉ. बी. ई. कुशारे, डॉ. पी. डी. भामरे यांनी अभिनंदन केले.

# वाघ अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी 'इंडस्ट्री रेडीनेस' कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

पंचवटी, ता. १२ : तंत्रशिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्व ओळखून शिक्षणक्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाने दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी कौशल्य वाढीसाठी प्लेसमेंट विभागामार्फत प्रथम ते अंतिम वर्षापर्यंत विविध उपक्रम राबविले जातात. यामध्ये सीव्ही रायटिंग, ॲप्टिट्यूड मॉक टेस्ट, मॉक मुलाखत, सीईओ कनेक्ट यांचा समावेश आहे.

या वर्षी रमा प्रसाद गोएंका समूहाकडून झेन्सार टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून तिसऱ्या वर्षाच्या अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. आरपीजी फाउंडेशनने प्रथम कॉम्प्युटर आणि आयटीच्या तिसऱ्या वर्षीच्या १५० विद्यार्थ्यांची ऑनलाइन टेस्ट घेतली. त्यानंतर ४५ विद्यार्थ्यांची प्रशिक्षणासाठी निवड केली. हे प्रशिक्षण ४ टप्प्यांमध्ये पार पडले. त्यामध्ये पहिल्या टप्प्यात प्रोग्रॅमिंग आणि सॉफ्ट स्किल्सचे ५२ तासाचे, दुसऱ्या टप्प्यात ॲप्टिट्यूड टेस्ट आणि लिडरशीप प्रशिक्षण ५२ तासाचे, तिसऱ्या टप्प्यात मुलाखत कशी द्यावी, मुलाखतीची तयारी कशी करावी याचे ४३ तासांचे आणि शेवटच्या टप्प्यात इंडस्ट्री लाइव्ह प्रोजेक्टवर काम करण्याची संधी देण्यात आली. त्यावर ४३ तासांचे प्रशिक्षण देण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या ट्रेनिंगच्या दृष्टीने संस्थेने आरपीजी फाउंडेशनसोबत सामंज्यस करार केला आहे. ट्रेनिंगचा मुख्य हेतू विद्यार्थ्यांच्या कौशल्यवाढीसाठी आणि त्यांना इंडस्ट्रीमध्ये जाण्यासाठी तयार करणे हा होता. विद्यार्थ्यांना कंपन्यांच्या निवड प्रक्रियेसाठी अत्यंत फायदा झाला, असे मत नामांकित कंपन्यांमध्ये नेमणूक मिळालेल्या विद्यार्थ्यांनी सांगितले. प्रशिक्षण घेतलेल्या ४५ विद्यार्थ्यांपैकी ४१ व विद्यार्थ्यांची नामवंत कंपन्यांमध्ये निवड झाली आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रशिक्षणाबद्दल संस्थेचे विश्वस्त समीर वाघ, चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, सचिव मा. प्रा. के. एस. बंदी यांनी अभिनंदन केले.

दै.दिव्य मराठी

# झेन्सार टेक्नॉलॉजीतर्फे के. के. वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी "इंडस्ट्री रेडीनेस कार्यशाळा"

**नाशिक- तंत्रशिक्षणा सोबत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्व ओळखून शिक्षणक्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या के के वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाने दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी कौशल्य वाढीसाठी प्लेसमेंट विभागामार्फत प्रथम ते अंतिम वर्षापर्यंत विविध उपक्रम राबविले जातात. यामध्ये सी व्ही रायटिंग, ॲप्टिट्यूड मॉक टेस्ट, मॉक इंटरव्हियूव, सीईऔ कनेक्ट यांचा समावेश आहे.**



तसेच या वर्षी रमा प्रसाद गोऐंका समुहांकडून झेन्सार टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून तिस-या वर्षाच्या अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. आरपीजी फाऊंडेशनने सर्वप्रथम कॅम्प्युटर आणि आयटीच्या तिसऱ्या वर्षीच्या १५० विद्यार्थ्यांची ऑनलाईन टेस्ट घेतली त्यानंतर ४५ विद्यार्थ्यांची प्रशिक्षणासाठी निवड केली. हे प्रशिक्षण ४ टप्प्यांमध्ये पार पडले. त्यामध्ये पहिल्या टप्प्यात प्रोग्रामिंग आणि सॉफ्ट स्किल्सचे ५२ तासाचे, दुसऱ्या टप्प्यात ऍप्टिट्यूड टेस्ट आणि लीडरशिपचे प्रशिक्षण ५२ तासाचे, तिसऱ्या टप्प्यात मुलाखत कशी द्यावी, मुलाखतची तयारी कशी करावी याचे ४३ तासांचे आणि शेवटच्या टप्प्यात इंडस्ट्री लाइव्ह प्रोजेक्टकवर काम करण्याची संधी देण्यात आली त्यावर ४३ तासांचे प्रशिक्षण देण्यात आले. असे एकूण १९० तासांचे आरपीजी फाऊंडेशन मधील झेन्सार टेकनॉलॉजीच्या औद्योगीक अनुभवी-तज्ज व्यक्तीं मार्फत प्रशिक्षण देण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या ट्रेनिंगच्या दृष्टिने के के वाघ ने आरपीजी फाऊंडेशन सोबत सामंज्यस करार(MOU) केला आहे. ट्रेनिंगचा मुख्य हेतू विद्यार्थ्यंनच्या कौशल्य वाढीसाठी आणि त्यांना इंडस्ट्री मध्ये जाण्यासाठी तयार करणे हा होता. विध्यार्थांना कंपन्यांच्या निवड प्रकियेसाठी अत्यंत फायदा झाला असे मत नामांकित कंपन्यांमध्ये नेमणूक मिळालेल्या विद्यार्थ्यांनी सांगितले.

प्रशिक्षण घेतलेल्या ४५ विद्यार्थ्यांपैकी ४१ व विद्यार्थ्यांची TCS, Wipro, Capgemini, Bosch, Ugam Solutions सारख्या नामवंत कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. जास्तीत जास्त १५ लाख आणि सरासरी ५.९० लाखापर्यंतचे पॅकेज देऊन ऑफर लेटर देण्यात आले आहेत. अशी माहिती महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ . पी के शहाबादकर यांनी दिली. विद्यार्थांन मधील सुप्त गूण विकसीत होऊन एक समाजभिमुख अभियंता निर्माण व्हावा यासाठी महाविद्यालय सातत्याने कार्य करत राहील असा विश्वास प्राचार्य केशव नांदूरकर यांनी व्यक्त केला. या विद्यार्थ्यांमध्ये कॉम्पुटर २४ आणि आयटी २१ असे एकूण ४५ आणि त्यामध्ये मुले २८ आणि मुली १७ आहेत अशी माहिती संगणक विभाग प्रमुख डॉ एस एस साने यांनी दिली.

विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रशिक्षणा बद्दल के के वाघ संस्थेचे विश्वस्त मा. समीर वाघ, चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, सचिव मा. प्रा के एस बंदी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# के. के. वाघ अभियांत्रिकीच्या केमिकल शाखेच्या विद्यार्थ्यांना नोकरी, उच्च शिक्षणाची सुवर्णसंधी



**नाशिक (प्रतिनिधी) :**

तंत्रज्ञान क्षेत्रात के. के. वाघ अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालय हे महाराष्ट्रात नावारूपास आले आहे. विद्यार्थ्यांना उच्च प्रतीचे शिक्षण देण्यासाठी व त्यांचे भविष्य उज्ज्वल करण्याच्या हेतूने महाविद्यालय तत्परतेने कार्यरत आहे. गेल्या तीन वर्षांपासून केमिकल विभागाच्या विद्यार्थ्यांची शाखानिहाय (कोर) कंपन्यांमध्ये जेएसडब्ल्यू पेंटस, जिंदाल, अदानी, टोयो इंजिनीअरिंग, आरती इंडस्ट्री, कोणार्क ग्लोबल, आर्ट रबर, सिप्ला, लुपिन, एस. व्ही. आय कार्बन, बायोकॉन आदी कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात निवड झाली आहे.

प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला केमिकल विभागाच्या विद्यार्थ्यांना आयटी क्षेत्रातील नोकरीच्या संधीबद्दल माहिती देत सी, सी प्लस-प्लस व अन्य प्रोग्रामिंगचे कौशल्य वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येतात. याचा विद्यार्थ्यांना आयटी क्षेत्रात नोकरी मिळविण्यासाठी उपयोग होतो. त्यात इन्फोसिस, टीसीएस, विप्रो, कॅपजेमिनी या नामांकित कंपनींचा समावेश आहे. के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम ते अंतिम वर्षांच्या विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासक्रम आणि तंत्रज्ञान शिक्षणासोबत डॉ. एपीजे अब्दुल कलाम सेंटरमार्फत कौशल्य वाढीसाठी प्रोग्रामिंग स्किल्स, सॉफ्ट स्किल्स, ॲप्टिट्यूड टेस्ट आदींचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे विद्यार्थी स्वतःचे करिअर घडवण्यासाठी सक्षम होतात, अशी माहिती प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी दिली. १९९९ सालापासून महाविद्यालयात केमिकल अभियांत्रिकी शाखेची स्थापना झाली. आतापर्यंत सुमारे १०००हून अधिक विद्यार्थी उत्तीर्ण होऊन देश-विदेशात विविध पदावर कार्यरत आहेत. त्यापैकी बहुतांश विद्यार्थ्यांनी स्वतःचे व्यवसाय थाटले असल्याची माहिती केमिकल विभागाचे विभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. माने यांनी दिली. १५ ते २० टक्के विद्यार्थी देश-विदेशातील एम. टेक., एमबीए आणि एम. एस. करण्यासाठी फ्रान्स, यूके, यूएसए, जर्मनी येथे गेले आहेत. विद्यार्थ्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेऊन ते यशस्वी उद्योजक झाले असल्याची माहिती ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. संस्थाध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त चांगदेवराव होळकर, अशोक भाई मर्चंट, सचिव प्रा. के. एस. बंदी, विभागप्रमुख डॉ. साने, डॉ. भामरे, प्रा. एम. बी. मुरुगकर, डॉ. पी. जे. पवार यांनी सर्व कंपन्यांचे आभार मानले.

Lokmat Times

# Training session organised for students

**LOKMAT NEWS NETWORK**
NASHIK, AUG 25

A training session was organised for third year students of KK Wagh College of Engineering. Around 46 students participated in the session and completed the training.

Out of them, 20 students have been selected in reputed companies, and they are getting an average package of up to ₹ 8.14 lakhs.

Free training was provided under the Corporate Social Responsibility (CSR) initiative by industrial experts. The training included various aspects like computer programming, soft skills, aptitude test, leadership and also interview.



Staff members felicitating students who participated in the training.

Nashik First
Page No. 2 Aug 26, 2022
Powered by: erelego.com

आपलं महानगर | My महानगर.com



# के. के. वाघ अभियांत्रिकीत प्रदर्शन

नाशिक । कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेच्या के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयातर्फे 'कनेक्टींग द डॉट्स' चित्रप्रदर्शन भरवण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता आणि नाविन्यपूर्णतेला चालना देण्यासाठी महाविद्यालयातर्फे नुकतेच प्रकल्प प्रदर्शन घेण्यात आले. यावेळी महाराष्ट्र सीआयआयचे चेअरमन श्रीराम नारायणन, महाराष्ट्र सीआयआयचे व्हाईस चेअरमन रॉबिन बॅनर्जी, महाराष्ट्र सीआयआयच्या नाशिक विभागाचे चेअरमन मनोज देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. एम. बी. ए. विभागातील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे समन्वय व आयोजन केले. विकसीत भारत घडविण्याकरिता अशा प्रकल्पना प्रोत्साहित करणारे हे एक महत्वपूर्ण पाऊल असल्याचे मान्यवरांनी म्हटले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ .केशव नांदूरकर व दिप्ती नाखले यांनी मार्गदर्शन केले.

AaplaMahanagar Edition
May 6, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

# QUICK न्यूज



# के. के. वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशीपची संधी

**नाशिक** । के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के के वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने के. के. वाघ महाविद्यालय व एबीबी कंपनी यांच्या संयुक्त विद्यामाने फॅक्टरी डिजिटलायझेशनला प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल एक्स्पो कार्यक्रमामध्ये इंटर्नशीप करण्याची संधी प्राप्त करुन दिली. यात महाविद्यालयातील शर्वरी फासे (इलेक्ट्रिक विभाग), सोहेल अन्सारी (मेकॅनिकल विभाग), साईराज दिक्षित (कॉम्पुटर विभाग) आणि रीतेश बोरसे (आयटी विभाग) या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या काळात विद्यार्थ्यांनी तीन महिने इंटर्नशिपच्या काळात उद्योग ४.० च्या दिशेने फॅक्टरी डिजिटलायझेशनला प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल एक्स्पोमध्ये लाईव्ह प्रोजेक्टमध्ये काम करुन नवनवीन संकल्पना समजून घेतल्या केले. यशस्वी इंटर्नशीप पुर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि ट्रॉफी देण्यात आली. याकाळात विद्यार्थ्यांना एबीबीचे सिबीन व मनोज वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विद्यार्थ्यांच्या कामकाजाबाबत एबीबीचे प्लांट प्रमुख गणेश कोठावदे यांनी समाधान व्यक्त केले. या प्रक्रियेत एबीबीचे एचआर प्रमुख दयानंद कुलकर्णी यांचे देखील सहकार्य लाभले.



# झेन्सार टेक्नॉलॉजीतर्फे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

## प्रशिक्षणातील ४६ पैकी २० विद्यार्थ्यांना नोकरी

**नाशिक : प्रतिनिधी**

के के वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक व रमा प्रसाद गोएंका समूह यांच्या संयुक्त विद्यमाने अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या तिसऱ्या वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी झेन्सार टेक्नॉलॉजीतर्फे कौशल्य विकासासाठी दोनशे तासांचे प्रशिक्षण पार पडले. यांत ४६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत प्रशिक्षण पूर्ण केले. त्यांना झेन्सार टेक्नॉलॉजीचे प्रमाणपत्र देण्यात आले. त्यापैकी २० विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली. यावेळी विद्यार्थ्यांना सरासरी ८.१४ लाखापर्यंतचे पॅकेज देण्यात आले आहे. झेन्सार टेक्नॉलॉजी च्या औद्योगिक अनुभवी-तज्ज्ञांकडून सीएसआर उपक्रमांतर्गत मोफत प्रशिक्षण देण्यात आले. तंत्रशिक्षणासोबत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्व ओळखून शिक्षणक्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या के के वाघअभियांत्रिकी महाविद्यालयाने दरवर्षी विद्यार्थ्यांच्या कौशल्य वाढीसाठी प्लेसमेंट विभागाकडून प्रथम ते अंतिम वर्षात असलेल्या विद्यार्थ्यांना विविध उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये सी व्ही लिखाण, ऍप्टिट्यूड मॉक टेस्टस, मॉक इंटरव्ह्यिूव, सीईओ कनेक्ट आदींची समावेश असतो अशी माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी के शहाबादकर यांनी दिली. विद्यार्थ्यांच्या ट्रेनिंगच्या दृष्टिने के के वाघने सन २०१८ सालापासून रमा प्रसाद गोएंका समुह फॉउंडेशन सोबत सामांज्यस करार केला आहे. चार बॅचेसनी आता पर्यंत प्रशिक्षणाचा लाभ घेतला असून, ट्रेनिंगचा मुख्य हेतू विद्यार्थ्यांच्या कौशल्य वाढीसाठी आणि त्यांना ओद्योगिक क्षेत्रात जाण्यासाठी तयार करणे हा होय. अशी माहिती प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी दिली.

पुढारी



नाशिक : प्लेसमेंट मिळालेल्या विद्यार्थ्यांसोबत के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचा प्राध्यापकवर्ग.

# 'वाघ अभियांत्रिकी'च्या १०० विद्यार्थ्यांना नोकरीची संधी

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षणसंस्थेच्या के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंटमार्फत नुकत्याच पार पडलेल्या कॅम्पस ड्राइव्हमध्ये तब्बल १०० विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली आहे. यामध्ये कॉम्प्युटर, आयटी, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, ई अ‍ॅण्ड टीसी, मेकॅनिकल, प्रॉडक्शन, केमिकल आणि सिव्हिल या विभागाच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विप्रो कंपनीत ८९, टीआयएए कंपनीत ७ तर अल्टिमेट्रिक कंपनीत ४ अशा एकूण १०० विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त झाली आहे. विद्यार्थ्यांना सर्वाधिक ७.५ तर सरासरी ४ लाखांचे पॅकेज देत ऑफर लेटर दिल्याची माहिती प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, चांगदेव होळकर, अशोक मर्चंट, प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, डॉ. एस. एस. साने, डॉ. बी. ई. कुशारे, डॉ. पी. डी. भामरे, डॉ. पी. जे. पवार आदींनी कौतुक केले.

My Nashik Edition
Apr 13, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

आपलं महानगर | My महानगर.com



# 'के. के. वाघ'च्या १२२ विद्यार्थ्यांना नोकरी

**नाशिक ।** कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेच्या के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंटमार्फत तब्बल १२२ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली आहे.

कॉम्पुटर, आयटी, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, इअँड टीसी, मेकॅनिकल, प्रोडक्शन, केमिकल, सिव्हिल, एम. सी. ए. आणि एम. ई. या विभागाच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अखेरच्या वर्षातील विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच नोकरी मिळावी या उद्देशाने संस्थेतर्फे कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन केले गेले. यात टी.सी.एस, बाँश, फिनिक्यू आणि अँटाँश या नामांकित कंपन्यांनी सहभाग नोंदवला.

सरासरी ६० टक्के गुण असलेल्या विद्यार्थ्यांना या कॅम्पस इंटरव्ह्यूवमध्ये भाग घेण्याची संधी मिळाली होती. सुरुवातीला प्री-प्लेसमेंट चर्चेद्वारे विद्यार्थ्यांना कंपन्याविषयी माहिती, मुलाखतीची प्रक्रिया तसेच पॅकेज आदी बाबतची माहिती देण्यात आली. या सर्व कंपनीची तीन टप्प्यात मुलाखत प्रक्रिया पार पडली. टीसीएसमध्ये ७९, बाँशमध्ये २२, अँटाँशमध्ये ११ आणि फिनिक्यूमध्ये १० असे एकूण १२२ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त झाली आहे. यांत प्रामुख्याने सर्वाधिक ९ लाखांचे तर सरासरी ४ लाखांचे पॅकेज देत विद्यार्थ्यांना मिळाले आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर आणि ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, विभाग प्रमुख डॉ. एस. एस. साने, डॉ. बी. ई. कुशारे, डॉ. पी. डी. भामरे, प्रा. एम. मुरुगकर, डॉ. पी. जे. पवार यांनी सर्व कंपन्यांचे आभार मानले आणि निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

AaplaMahanagar Edition
Apr 22, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

# वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना नोकरी

**नाशिक । दि. १२ प्रतिनिधी**



के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अभियांत्रिकी महाविद्यालय ट्रेनिंग अँड प्लेसमेंट मार्फत नुकत्याच कॅम्पस मुलाखती पार पडल्या. यात प्रामुख्याने सर्वाधिक ७.५ तर सरासरी ४ लाखांचे पॅकेज देत ऑफर लेटर देण्यात आले. विप्रो ८९, टी.आय.ए.ए ०७, आणि अल्टीमेट्रिक ४ अशा एकूण १०० विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त झाली आहे. या मध्ये कॉम्पुटर २९, आयटी १०, इलेक्ट्रिकल १५, इलेक्ट्रॉनिक्स १०, इ अँड टीसी १५, मेकॅनिकल १४, प्रोडक्शन २, केमिकल २, सिव्हिल ३ अशा विविध विभातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी के शहाबादकर यांनी दिली.

विद्यार्थ्यांना मिळालेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, प्रा के एस बंदी, डॉ. एस एस साने, डॉ बी ई कुशारे, डॉ पी डी भामरे, प्रा एम मुरुगकर, डॉ पी जे पवार यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

13-04-2022
देशदूत

Lokmat Times

# Placements in IT sector

**LOKMAT NEWS NETWORK**
NASHIK JUL 4

Students of electrical and mechanical engineering departments of KK Wagh Engineering college have received placement through campus interviews held recently.

In all, 262 students have received placement with good packages in core sectors through these interviews in various reputed companies. These include 110 students from electrical stream and 152 students from mechanical stream. Around 40 to 45 percent students from these streams have got jobs in the IT sector as data analysts, project engineers, systems engineers, assistant systems engineers and graduate engineer trainees. This information was given by the training and placement officer of the college Dr PK Shahabadkar.

Selected students informed that they benefited from the training, mock interviews and aptitude tests conducted by the college from time to time.

College principal Dr Keshav Nandurkar informed that the students of mechanical and electrical streams were made aware of the importance of the knowledge of IT and were trained in various languages of programming during their course of studies. This initiative helped them receive good placements through the campus interviews.

The selected students have been congratulated by chairman of the institute Sameer Wagh, trustees Changdev Holkar, Ashok Merchant and others.

Nashik First
Page No. 2 Jul 05, 2022
Powered by: erelego.com

# वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना आयटी क्षेत्रात नोकरीची संधी



**नाशिक : प्रतिनिधी**

के के वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या २६२ विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमध्ये नोकरीची संधी मिळाली आहे. केवळ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या (आयटी) विद्यार्थ्यांसह इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल शाखेच्या विद्यार्थ्यांना देखील आयटी क्षेत्रात काम करण्याची उत्कृष्ट संधी मिळाली आहे.

यामध्ये इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल शाखेतील अनुक्रमे ११० व १५२ असे एकूण २६२ विद्यार्थ्यांची मुख्य स्पेशलाइजेशन क्षेत्रात (कोर) आणि आयटी क्षेत्रात निवड झाली आहे. शाखा निहाय कंपन्यांमध्ये (कोर) मध्ये एबीबी, अदानी, महिंद्रा अँड महिंद्रा, रिलायन्स, प्राज, केएसबी, रिषभ आणि आयटी कंपन्यांमध्ये इन्फोसीस, टीसीएस, विप्रो, हेक्सावेअर, कॅपजेमिनी, बिर्लासॉफ्ट, अटॉस यासारख्या अनेक नामवंत कंपन्यांचा समावेश आहे. सर्वाधिक आठ लाखांचे तर सरासरी चार लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज विद्यार्थ्यांना मिळाले आहे.

सुमारे ४० ते ४५ टक्क्यांपर्यंत इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल शाखेच्या विद्यार्थांना आयटी क्षेत्रात डाटा अनॅलिस्ट, प्रोजेक्ट इंजिनीयर, सिस्टम्स इंजिनीयर, असिस्टंट सिस्टम्स इंजिनीयर आणि ग्रेजुएट इंजीनियर ट्रेनी यांसारख्या पदांसाठी निवड झालेली आहे अशी माहिती महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी के शहाबादकर यांनी दिली. महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांना दिलेल्या ट्रेनिंग, मॉक इंटरव्ह्यू आणि एप्टीट्यूड ट्रेनिंगचा या सर्वांचा कॅम्पस इंटरव्ह्युवमध्ये निवड होण्यासाठी खूप फायदा झाला असे कंपनीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी सांगितले.

२०२१-२२ शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल शाखेच्या विद्यार्थांना आयटी क्षेत्रातील नोकरीच्या संधींबद्दल जाणीव करून देऊन C, C ++ व अन्य प्रोग्रामिंगचे कौशल्य वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात आले. या उपक्रमांचा फायदा करून घेऊन आयटी क्षेत्रात काम करण्याचे आव्हान स्वीकारून तयारी करावी असा संदेश प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी विद्यार्थ्यांना दिला.

संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, सचिव के एस बंदी, संगणक विभाग प्रमुख डॉ एस. एस. साने, डॉ बी. ई. कुशारे, डॉ पी. डी. भामरे, प्रा. एम. मुरुगकर, डॉ.पी. जे. पवार यांनी सर्व कंपन्यांचे आभार मानले.

लोकनामा

# झेन्सार टेक्नॉलॉजीतर्फे दोनशे तासांचे प्रशिक्षण

## प्रशिक्षणातील ४६ पैकी २० विद्यार्थ्यांना नोकरी



**नाशिक** : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय (नाशिक) व रमा प्रसाद गोएंका समूह यांच्या संयुक्त विद्यमाने अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या तिसऱ्या वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी झेन्सार टेक्नॉलॉजीतर्फे कौशल्य विकासासाठी दोनशे तासांचे प्रशिक्षण झाले. यात ४६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांपैकी २० विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांत निवड झाली. यावेळी विद्यार्थ्यांना सरासरी ८.१४ लाखापर्यंतचे पॅकेज देण्यात आले.

झेन्सार टेक्नॉलॉजीच्या औद्योगिक अनुभवी तज्ज्ञांकडून सीएसआर उपक्रमांतर्गत मोफत प्रशिक्षण देण्यात आले. त्यात कॉम्प्युटर प्रोग्रामिंग, सॉफ्ट स्किल्स, ॲप्टिट्यूड टेस्ट, लीडरशिप व इंटरव्ह्यूव अशा विविध बाबींचा समावेश होता.

तंत्रशिक्षणासोबत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्व ओळखून शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाने दरवर्षी विद्यार्थ्यांच्या कौशल्यवाढीसाठी प्लेसमेंट विभागाकडून प्रथम ते अंतिम वर्षात असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविले जातात. त्यात सीव्ही लिखाण, ॲप्टिट्यूड मॉक टेस्ट, मॉक इंटरव्ह्यूव, सीईओ कनेक्ट आदींचा समावेश असतो, अशी माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली.

प्रशिक्षणाचा मुख्य हेतू विद्यार्थ्यांच्या कौशल्यवाढीसाठी आणि त्यांना औद्योगिक क्षेत्रात जाण्यासाठी तयार करणे, हा होय. त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कंपन्यांच्या निवड प्रक्रियेसाठी फायदा झाला, असे मत नामांकित कंपन्यांत प्लेसमेंट झालेले विद्यार्थी व्यक्त करतात, अशी माहिती प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी दिली. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, सचिव प्रा. के. एस. बंदी, विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने, डॉ. डी. एम. चांदवडकर, डॉ. पी. डी. भामरे यांनी कंपन्यांचे आभार मानले.

लोकमत

# के. के. वाघच्या २६२ विद्यार्थ्यांना मिळाली नोकरीची संधी

## विविध कंपन्यांचा समावेश : वर्षभरात चारपासून आठ लाखांचे वार्षिक पॅकेज



**नाशिक** : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या २६२ विद्यार्थ्यांना सन २०२१-२२ यावर्षी विविध कंपन्यांमध्ये नोकरीची संधी मिळाली आहे. केवळ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्याच (आयटी) विद्यार्थ्यांना आयटी क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली. त्या व्यतिरिक्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल शाखेच्या विद्यार्थ्यांनादेखील आयटी क्षेत्रात काम करण्याची उत्कृष्ट संधी मिळाली आहे.

इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल शाखेतील अनुक्रमे ११० व १५२ असे एकूण २६२ विद्यार्थ्यांची मुख्य स्पेशलाइजेशन क्षेत्रात (कोर) आणि आयटी क्षेत्रात निवड झाली आहे. शाखा निहाय कंपन्यांमध्ये (कोर) मध्ये एबीबी, अदानी, महिंद्रा अँड महिंद्रा, रिलायन्स, प्राज, केएसबी, रिषभ आणि आयटी कंपन्यांमध्ये इन्फोसीस, टीसीएस, विप्रो, हेक्सावेअर, कॅपजेमिनी, बिर्लासॉफ्ट, अटॉस आदि कंपनींचा समावेश आहे. सुमारे ४० ते ४५ टक्क्यांपर्यंत इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल शाखेच्या विद्यार्थांना आयटी क्षेत्रात डाटा अनॅलिस्ट, प्रोजेक्ट इंजिनिअर, सिस्टम्स इंजिनिअर, असिस्टंट सिस्टम्स इंजिनिअर आणि ग्रेजुएट इंजिनिअर ट्रेनी यांसारख्या पदांसाठी निवड झालेली आहे, अशी माहिती डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे समीर वाघ, चांगदेवराव होळकर, अशोकभाई मर्चंट, प्रा. के. एस. बंदी यांनी सर्व कंपन्यांचे आभार मानले.